## - प्रेस नोट -

दि. ०८/०९/२०२६

## आर.सी.एफ पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि.०७/०९/२०२६ रोजी ०१.०० ते ०१.१० वा.च्या दरम्यान फिर्यादी प्रशांत बाळू आव्हाड, वय-३३ वर्षे, धंदा-नोकरी, रा.ठी. चेंबूर कॅम्प, मुंबई हे एम एस बिल्डिंग ३१,चेंबुर कॅम्प, मुंबई येथे त्यांचा मित्र नामे ललित वलोदरा हे बियर पीत थांबले हाते. त्यावेळेस गुंडप्रवृत्तीचा असलेला अटक आरोपी पुरूष वय-२५ वर्षे तेथे आला आणि फिर्यादीकडे बियरची मागणी केली. फिर्यादीने त्याला बियर देण्यास नकार दिला असता त्या कारणाने त्याने चाकू घेऊन जीवे ठार मारण्याची धमकी दिली व ठार मारण्याच्या उददेशाने फिर्यादीच्या अंगावर धावून आला आणि फिर्यादीच्या मानेवर वार केला. त्यावेळेस फिर्यादीने त्यांच्या डाव्या हाताने चाकू अडवण्याचा प्रयत्न करत असताना त्या चाकुचा वार फिर्यादीच्या डाव्या हाताच्या तळहातावर अंगठा व बोटाच्या मधोमध लागला व फिर्यादीला डाव्या हाताला गंभीर दुखापत झाली. अटक आरोपी हा गुंडप्रवृत्तीचा असुन त्याची फिर्यादीच्या परिसरात दहशत आहे. त्याच्या दहशतीने फिर्यादीच्या परिसरात फिर्यादीला वाचवण्यासाठी पुढे काणी आले नाही व तेथुन लोक सैरावैरा पळुन गेले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.०७/०९/२०२६ रोजी गु.र.क्र. ५६६/२६, कलम १०९(१),११५(५),३५१(२),३५२ बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------